# मराठी भाषेतील संख्यानावे

पंचाहत्तर लिही असं म्हटल्यावर ७५ लिहिता न येणारी मुलं अगदी वरच्या इयत्तांमध्येही दिसतात. ७५ लिहून दाखवले आणि हे किती आहेत असं विचारलं तर ते सांगता न येणारी मुलंही दिसतात. या मुलांना संख्या येत नाहीत असं आपण म्हणतो. पण हे विधान तपासून पहायला हवे. अंकात लिहिलेले ७५ दाखवून 'मला इतके रुपये मोजून दे' असं सांगितलं तर यातील अनेक मुलं बरोबर पंचाहत्तर रुपये देतात. किंवा त्यांच्या हातात पंचाहत्तर रुपये ठेवले आणि हे किती आहेत ते अंकात लिही असं सांगितलं तर यातील बरीचशी मुलं ते बरोबर करतात. याचा अर्थ असा की रुपयांमधली संख्या आणणि अंकांतील संख्या यांचं नातं, म्हणजेच संख्येचा अर्थ त्यांना समजलेला असतो. अडचण असते ती संख्येच्या नावात.

मराठीत (आणि अनेक उत्तर भारतीय भाषांमध्ये) संख्यानावांमध्ये दोन मुख्य अडचणी आहेत.
१) आपण म्हणतो 'एकवीस' आणि लिहितो २१.




म्हणजे नावातील शब्दांची रचना आणि अंकातली रचना उलटी असते.
त्यामुळे पस्तीस लिही म्हटल्यावर अनेक मुले ५३ लिहितात.
ही भाषेमुळे निर्माण होणारी अडचण आहे. मुलांच्या समजेतील नाही.

२) इंग्रजीत जसे एकदा का 'one to nine' and 'ten, twenty, thirty...' ही नावे पाठ झाली, की 21 to 29 , 31 to 39 या सर्वांची नावे एकाच नियमाने येतात. मराठीत तसे नाही. सर्व ९९ नावे निरनिराळी आहेत. उदा. एककात २ असेल, तर बा, ब, बे, बहा, ब्या असे शब्द येतात. किंवा दशकात ५ असेल तर कधी वन्न, कधी पन्न येते. सहा वर्षे वयाच्या मुलांना हे समजावणे खूप अवघड आहे.
मराठीतील १ ते ९९ ची नावे या निकषांवर तपासून पहा. आपल्या लक्षात येईल की सर्व ९९ नावे पाठ करावी लागतील. सलग पाठ केलेल्या १०० नावांमधले ७५ वे नाव आठवायला अडचण ही येणारच.

**यावर उपाय काय?**

**१.** वस्तूभाषेत आणि कृतीभाषेत संख्यांची संकल्पना शिकताना, म्हणजे सुमारे एक महिनाभर संख्यांची फक्त गणिती नावे वापरावीत. (एक दशक एक, एक दशक दोन याप्रमाणे)
२. शंभर मण्यांच्या संख्यामाळेवर रोज संख्या मोजाव्यात.
३. दुसऱ्या महिन्यात जेव्हा संख्या अंकात लिहिण्याची सुरुवात होते, तेव्हा संख्यामाळेवरील मोजणीत गणिती नावाबरोबर व्यावहारिक नावही घ्यावे. उदा. एक दशक एक – अकरा, एक दशक दोन – बारा... याप्रमाणे

लहान वयातील मुलांना ही शंभर नावे पाठच करावी लागतात. तत्याला काही काळही जावा लागततो तत्यामुळे सुररुवातीचच्या काळात शिक्षकांनी स्वतःसुद्धा 'पाच दशक तीन – त्रेपन्न' अशी दोन्हीही नावे एकत्र वापरावीत. मुलांनाही वापरू द्यावीत. हळूहळू मुले 'त्रेपन्न' असे एकच नाव वापरायला शिकतात. संख्यामाळेवर रोज संख्या म्हणण्याचा या कामात उपयोग होतो.

वयाने मोठ्या असलेल्या आणि संख्यानावात अडचणी असलेल्या मुलांना संख्यानावांमागील तत्त्व समजावून सांगता येते. पुढील पानावर दिलेल्याप्रमाणे सराव घेतल्यास त्यांना मदत होते.

संख्यानावात अडकणे हे भाषेच्या अडचणीमुळे आहे हे मात्र पक्के ध्यानात ठेवावे आणि अशा मुलांना संख्या येत नाहीत असा निष्कर्ष काढू नये अथवा तसे लेबल लावू नये.

## संख्यांची व्यवहारातील नावे

पूर्ण दशकांची नावे –

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | दहा | 20 | ______ | 30 | ______ | 40 | ______ | 50 | ______ |
| 60 | ______ | 70 | ______ | 80 | ______ | 90 | ______ | 100 | ______ |

एककानुसार संख्यानावात आधी येणारे शब्द –

| दशक | एकक | शब्द |
|---|---|---|
| | 1 | एक , एक्के , एक्का , एक्क्या |
| | 2 | बा, ब, बे, बहा, ब्या |
| | 3 | ते, तेहे, त्रे, त्र्या |
| | 4 | चो, चौ, चव्वे, चौऱ्या |
| | 5 | पंच, प, पंचे, पंचा, पा |
| | 6 | छ, सेहे, सहा, शहा |
| | 7 | सत्ता, सद, सत्ते, सदु, सत्त्या |
| | 8 | अठ्ठा, अड, अठ्ठे, अडु, अठ्ठ्या |
| | 9 | एकोण, नव्व्या |
| | 0 | दहा, वीस, तीस, चाळीस, पन्नास, साठ, सत्तर, ऐंशी, नव्वद |

आधीची संख्या अंकात लिहा व दोन्हीही संख्यांची नावे लिहा–

| दशक | एकक | नाव | दशक | एकक | नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | एकोणीस | 2 | 0 | वीस |
| | | ______ | 3 | 0 | ______ |
| | | ______ | 8 | 0 | ______ |
| | | ______ | 7 | 0 | ______ |
| | | ______ | 5 | 0 | ______ |
| | | ______ | 9 | 0 | ______ |

25 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| 2 | 5 |

पाच वीस = पंचवीस

32 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

35 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

42 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

33 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

47 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

53 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

58 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

84 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

92 = 

| दशक | एकक |
| --- | --- |
| | |

_______ = _______

| | | | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| 19 = एकोणीस | 29 = | 39 = | 49 = | 59 = |

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| 69 = | 79 = | 89 = | 99 = |

68 =

| दशक | एकक |
|---|---|
| 6 | 8 |

आठ साठ = अडुसष्ट

85 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

91 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

68 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

75 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

78 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

72 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

65 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

78 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

86 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

57 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______

87 =

| दशक | एकक |
|---|---|
| | |

__________ = ______